आवक क्र./ वर्ष ९३८९
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
17 OCT 2012
कार्यासन क्रमांक ५
का.अ.
नोंदणी उपमहानिरीक्षक
नोंदणी महानिरीक्षक

**पुणे महानगर क्षेत्राच्या हद्दीत येणाऱ्या तालुक्यांचे सामुहिक प्रोत्साहन योजना, २००७ नुसार केलेले वर्गीकरण कायम ठेवण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक पीएसआय-२०१२/प्र.क्र. ८०/उद्योग-८

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक ३१ ऑगस्ट, २०१२

**वाचा** १) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक- पीएसआय-१७०७/प्र.क्र. ५०/उद्योग-८, दिनांक ३०/३/२००७

२) शासन अधिसुचना, नगर विकास विभाग, क्रमांक टिपीएस-१८९९/११९१/प्र.क्र. ८०/९९/नवि-१३, दिनांक २३ जुलै, १९९९

३) शासन अधिसुचना, नगर विकास विभाग, क्रमांक- एमपीसी-२०१०/१०३९/प्र.क्र. १४९/२०१०/नवि-३०, दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२

**प्रस्तावना**

सामुहिक प्रोत्साहन योजना, २००७ अंतर्गत पात्र उद्योग घटकांना तालुक्याच्या वर्गीकरणानुसार प्रोत्साहने देय करण्यात येतात. सामुहिक प्रोत्साहन योजना, २००७ अंतर्गत पुणे महानगर क्षेत्राच्या हद्दीतील पुणे शहर (पुर्ण तालुका), हवेली, खेड मावळ व मुळशी या तालुक्यांचा काही भाग **"अ"** वर्गीकृत क्षेत्रात (तालुक्यात) व पुणे महानगर क्षेत्राच्या हद्दीबाहेरील हवेली, मुळशी व मावळ या तालुक्यांचा उर्वरीत भाग **"ब"** वर्गीकृत क्षेत्रात (तालुक्यात) तसेच खेड तालुक्याचा पुणे महानगर क्षेत्राच्या हद्दीबाहेरील भाग **"क"** वर्गीकृत क्षेत्रात (तालुक्यात) समाविष्ट आहे. तसेच शिरुर, दौंड, भोर हे पुणे महानगर क्षेत्राच्या हद्दीबाहेर असलेले तालुके **"क"** वर्गीकृत क्षेत्रात (तालुक्यात) आहेत.

२१६
१०/१०/१२

२. नगर विकास विभागाने दिनांक २३/७/१९९९ च्या अधिसुचने अन्वये अस्तित्वात असलेल्या पुणे महानगर क्षेत्राचे विस्तारीकरण करुन **"नविन पुणे महानगर क्षेत्राची"** घोषणा केली आहे. या नविन पुणे महानगर क्षेत्रात पुणे जिल्हयातील मावळ व पुणे शहर तालुक्यांचे पुर्ण क्षेत्र तसेच हवेली, भोर, दौंड, शिरुर, मुळशी आणि खेड तालुक्यातील काही भाग यांचा समावेश आहे. सदर क्षेत्र नगर विकास विभागाच्या दिनांक २९/२/२०१२ च्या अधिसुचनेव्दारे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ नुसार **"पुणे महानगर नियोजन क्षेत्र"** म्हणून नियत करण्यात आले आहे.

३. नगर विकास विभागाच्या उपरोक्त दिनांक २९/२/२०१२ च्या अधिसुचनेचा परिणाम म्हणून पुर्वीच्या पुणे महानगर क्षेत्राच्या हद्दीबाहेरील मावळ तालुक्याचा उर्वरीत भाग, हवेली, मुळशी, खेड या तालुक्यांतील अतिरिक्त भाग व शिरुर, दौंड, भोर या तालुक्यांतील काही भागांचा समावेश नविन पुणे महानगर क्षेत्राच्या हद्दीत झाला आहे. त्यामुळे साप्रोयो, २००७ अंतर्गत सदर तालुक्यांचे वर्गीकरण "अ" वर्गीकृत तालुक्यात होत असल्याने या तालुक्यात स्थापन होणाऱ्या उद्योग घटकांना "अ" वर्गीकृत तालुक्याची प्रोत्साहने देय करावीत किंवा सामुहिक प्रोत्साहन योजना, २००७ च्या मुळ वर्गीकरणानुसार प्रोत्साहने देय करावीत, याबाबत स्पष्टीकरण करणे आवश्यक झाले आहे. याबाबत निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील छाननी समितीने केलेल्या शिफारसीनुसार शासनाने प्रस्तुत बाबीवर पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

अ) नगर विकास विभागाची दिनांक २३/७/१९९९ रोजीची पुणे महानगर क्षेत्र हद्द घोषित करण्यासाठीची अधिसुचना व त्यानंतर दिनांक २९/२/२०१२ रोजी हद्द अंतिम करण्याची अधिसुचना निर्गमित करण्यापुर्वी ज्या उद्योग घटकांना साप्रोयो, २००७ अंतर्गत प्रोत्साहने मंजूर करण्यात आली आहेत, अशा उद्योग घटकांना नगर विकास विभागाच्या सदर अधिसुचनेमुळे झालेल्या क्षेत्र बदलाचा कोणताही परिणाम न होता साप्रोयो, २००७ नुसार असलेल्या तालुक्यांच्या वर्गीकरणानुसार प्रोत्साहने देय राहतील.

ब) नगर विकास विभागाची दिनांक २३/७/१९९९ रोजीची पुणे महानगर क्षेत्र हद्द घोषित करण्यासाठीची अधिसुचना व त्यानंतर दिनांक २९/२/२०१२ रोजी हद्द अंतिम करण्याची अधिसुचना निर्गमित करण्यापुर्वी जे क्षेत्र/तालुके पुणे महानगर क्षेत्राच्या हद्दीबाहेर होते (Outside PMR) ते क्षेत्र/तालुके नगर विकास विभागाच्या वरील अधिसुचनेमुळे पुणे महानगर क्षेत्रात (Within PMR) समाविष्ट झाले असले तरी अशा भोगोलीक क्षेत्राचे/ तालुक्यांचे नगर विकास विभागाच्या दिनांक २९/२/२०१२ रोजीच्या अधिसुचनेपुर्वी असलेले वर्गीकरण, नगर विकास विभागाच्या या अधिसूचनेचा कोणताही परिणाम न होता सामुहिक प्रोत्साहन योजना, २००७ अंतर्गत प्रोत्साहनाकरीता कायम राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दा. अं. कुलकर्णी)
शासनाचे अवर सचिव

प्रति,

१) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई

२) विक्रीकर आयुक्त, मुंबई

D:\VILAS DHALE\Stamp duty pune G R doc doc

३) विभागीय आयुक्त, पुणे

४) जिल्हाधिकारी, पुणे

५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई

६) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई

७) विभागीय सह संचालक (उद्योग), पुणे

८) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे

९) सहायक संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग, पुणे

१०) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे

११) सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (निम्नश्रेणी) व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालयाची इमारत, ५ फायन्सांन्स रोड, पुणे-१

१२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

१३) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

१४) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

१५) उद्योग, उर्जा व कामगार विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई

१६) महालेखापाल (लेखा परीक्षा) -१, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) -१, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१८) महालेखापाल (लेखा परीक्षा)- २, महाराष्ट्र राज्य, नागपूर

१९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- २, महाराष्ट्र राज्य, नागपूर

२०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

२१) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई

२२) निवड नस्ती, (उद्योग-८ कार्यासन), मंत्रालय, मुंबई